दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार, दि. ०४ जून, २०२६ | वर्ष - १ | अंक - २४९ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

गुरुवार, दि. ४ जून २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, कृष्णपक्ष, चतुर्थी रात्री ११-३१ पर्यंत नंतर पंचमी तिथी, दिवस नक्षत्र– उत्तराषाढा रात्री ३-४२ पर्यंत नंतर श्रवण, चंद्र रास - धनु सकाळी ७-४२ पर्यंत नंतर मकर, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - कर्क

### फुकट्यांवर कारवाई

**पुणे** : आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या सुरुवातीलाच मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने विनातिकीट आणि अनियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर कारवाई केली आहे. तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी एप्रिल ते मे या दोन महिन्यांच्या कालावधीत विनातिकीट प्रवासाच्या ४ लाख ३० हजार प्रकरणांमधून ३० कोटी १३ लाख रुपयांची उल्लेखनीय दंड वसुली केली. मागील वर्षी याच कालावधीत २ लाख ७५ हजार प्रकरणांमधून १२ कोटी २ लाख रुपये वसूल करण्यात आले होते.

## सारांश वृत्त

### उत्तर प्रदेशात ईव्ही वातानुकूलीत बसेस

**लखनौ** : उत्तर प्रदेशाच्या शहरांमध्ये १,७२५ वातानुकूलित इलेक्ट्रिक बसेस चालवण्याच्या प्रस्तावाला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. आग्रा, अलीगड, अयोध्या, बरेली, फिरोजाबाद, गाझियाबाद, गोरखपूर, झाशी, कानपूर, लखनौ, मथुरा-वृंदावन, मेरठ, मुरादाबाद, प्रयागराज, वाराणसी आणि नोएडा या शहरांचा समावेश आहे.

### ओडिशात वादळी वाऱ्याची शक्यता

**भुवनेश्वर** : येत्या चार दिवसांत ओडिशाच्या अनेक भागात वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. गुरुवारी २२ जिल्ह्यांमध्ये दुपारी आणि संध्याकाळच्या वेळी वीज आणि वादळी पृष्ठभागाच्या वाऱ्यासह गडगडाटी वादळ होईल, ज्यासाठी हवामान कार्यालयाने यलो अलर्ट जारी केला आहे. बालासोर, क्योंझर, मयूरभंज, कालाहांडी, नबरंगपूर, कोरापुट, मलकानगिरी, भद्रक, जाजपूर, केंद्रपाडा, जगतसिंगापूर, कटक, अंगुल, ढेंकनाल, बौध, कंधमाल, रायगडा, गजपती आणि नयागड या जिल्ह्यांचा यात समावेश आहे.

### सेंद्रीय खतांना चालना द्यावी

**चेन्नई** : केंद्रीय कृषिमंत्री शिवराज चौहान यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी कृत्रिम आणि रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी पावले उचलावीत, असे आवाहन तामिळनाडूचे भाजपचे अध्यक्ष नैनार नागेंथरन यांनी बुधवारी केले. पारंपारिक सेंद्रिय खते आणि जैव-खतांचा व्यापक अवलंब करण्यासाठी उपाययोजना केल्या जाऊ शकतात, असे ते म्हणाले.

### स्कूल बस शुल्कात मोठी वाढ; इंधन दरवाढीची विद्यार्थ्यांनाही झळ

# पालकांचे बजेट साफ कोलमडले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वीच पालकांच्या खर्चात वाढ होणार असून राज्यातील स्कूल बस आणि व्हॅनच्या भाड्यात सरासरी १५ टक्के वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमतींसह वाहन देखभाल, विमा, टोल आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील वाढत्या खर्चामुळे ही भाडेवाढ लागू करण्यात येत असल्याची माहिती स्कूल बस ओनर्स असोसिएशन महाराष्ट्रने दिली.




असोसिएशनच्या म्हणण्यानुसार, इंधन दरवाढीमुळे विद्यार्थी वाहतूक व्यवसायावर मोठा आर्थिक ताण निर्माण झाला आहे. वाढत्या खर्चामुळे शुल्कवाढ अपरिहार्य बनली असून यासंदर्भात सरकारकडे वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही मदत मिळाली नसल्याचा दावा संघटनेने केला आहे.

डिझेल आणि पेट्रोलच्या वाढलेल्या किमतींसोबतच टायर, सुटे भाग, वाहन दुरुस्ती, विमा हप्ते, टोल शुल्क आणि चालक-वाहकांच्या वेतनातही वाढ झाली आहे. त्यामुळे वाहतूक व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी भाडेवाढीचा निर्णय घ्यावा लागल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

या निर्णयानुसार जून महिन्यापासून नवीन भाडेदर लागू होणार आहेत. सध्या एखाद्या विद्यार्थ्याची मासिक बस फी ५ हजार रुपये असल्यास त्यामध्ये सुमारे ७५० रुपयांची वाढ होईल. काही भागांमध्ये प्रति किलोमीटर दरातही वाढ करण्यात आली असून ती १०० रुपयांपर्यंत पोहोचल्याची माहिती समोर आली आहे. राज्यात हजारो स्कूल बस आणि व्हॅनद्वारे लाखो विद्यार्थ्यांची वाहतूक केली जाते. त्यामुळे या भाडेवाढीचा थेट परिणाम पालकांच्या मासिक बजेटवर होणार आहे.

शाळा सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर आधीच प्रवेश शुल्क, पुस्तके, गणवेश आणि इतर शैक्षणिक खर्चाचा भार सहन करणाऱ्या पालकांसाठी ही वाढ चिंतेची बाब ठरणार आहे.

दरम्यान, स्कूल बस ओनर्स असोसिएशनने पालकांनी परिस्थिती समजून घेऊन सहकार्य करावे, तसेच राज्य सरकारने शालेय वाहतूक व्यवसायाला दिलासा देण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

# १५ जूनलाच वाजणार राज्यात शाळेची घंटा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यातील राज्य मंडळाच्या शाळा उशीरा सुरू होणार किंवा ऑनलाइन पद्धतीने सुरू होणार असल्याच्या चर्चांना अखेर पूर्णविराम मिळाला आहे. शालेय शिक्षण विभागाने स्पष्ट केले असून राज्यातील नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात नियोजित वेळापत्रकानुसार १५ जूनपासूनच होणार आहे.

शिक्षण विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्य मंडळाशी संलग्न प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा १५ जून रोजी नियमितपणे सुरू होतील. शाळा सुरू करण्याच्या निर्णयात कोणताही बदल करण्यात आलेला नसून विद्यार्थ्यांचे शिक्षण पारंपरिक ऑफलाइन पद्धतीनेच सुरू होणार आहे. राज्य मंडळाच्या शाळांना २ मेपासून उन्हाळी सुट्टी देण्यात आली होती. सुटीनंतर शाळा नेहमीप्रमाणे १५ जून रोजी सुरू करण्याचे नियोजन कायम ठेवण्यात आले आहे. त्यामुळे शाळा उशीरा सुरू होणार किंवा ऑनलाइन वर्ग सुरू राहणार असल्याच्या चर्चांना अधिकृतपणे पूर्णविराम मिळाला आहे.

विदर्भातील शाळांसाठी विशेष वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. उष्णतेचा विचार करून १५ जून ते २९ जून या कालावधीत विदर्भातील शाळा सकाळी ७ ते ११.४५ या वेळेत भरविण्यात येणार आहेत. त्यानंतर ३० जूनपासून विदर्भासह राज्यातील सर्व शाळा नियमित वेळेनुसार सुरू होतील. इतर शिक्षण मंडळांच्या शाळांना स्थानिक परिस्थितीनुसार वेळापत्रक निश्चित करण्याची मुभा देण्यात आली आहे.

# संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे ७ जुलै रोजी प्रस्थान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : आषाढी वारीचे वेध लागलेल्या वारकरी संप्रदायासाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या ३४१ व्या आषाढी पायी वारी पालखी सोहळ्याचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून, ७ जुलै २०२६ रोजी श्रीक्षेत्र देहू येथून संत तुकाराम महाराजांची पालखी पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे.

यंदाची आषाढी एकादशी २५ जुलै २०२६ रोजी असल्याने राज्यभरातील वारकरी आणि दिंड्यांचे नियोजन सुरू झाले आहे. जेष्ठ वद्य सप्तमी, मंगळवार ७ जुलै रोजी देहू येथील मुख्य देऊळवाड्यातून पालखी सोहळा भक्ती, श्रद्धा आणि विठ्ठलनामाच्या गजरात पंढरपूरकडे रवाना होईल.

यंदाच्या पालखी सोहळ्यासाठी ह.भ.प. विक्रमसिंह उमराज मोरे, ह.भ.प. उमेश सुरेश मोरे आणि ह.भ.प. लक्ष्मण दत्तात्रय मोरे यांची पालखी सोहळा प्रमुख म्हणून निवड करण्यात आली आहे. तसेच पालखी रथ आणि चौघडा गाडीसाठी संस्थानने नव्याने तीन बैलजोड्या खरेदी केल्या असून त्या यंदाच्या वारीत सहभागी होणार आहेत.

संत तुकाराम महाराजांच्या पालखीबरोबरच संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीबाबतही वारकऱ्यांमध्ये उत्सुकता आहे. आळंदीहून ज्ञानेश्वर माऊलींची पालखी पंढरपूरकडे कधी प्रस्थान करणार याची माहिती लवकरच जाहीर होण्याची अपेक्षा आहे.

### तंत्रज्ञान क्षेत्रात महाराष्ट्राची मोठी झेप

# पहिले क्वांटम-डीप टेक धोरण जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्याला अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात देशात अग्रस्थानी नेण्याच्या दिशेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्याच्या पहिल्या 'महाराष्ट्र क्वांटम धोरण' आणि 'महाराष्ट्र डीप टेक धोरण' यांना मान्यता देण्यात आली असून, संपूर्ण डीप टेक परिसंस्थेसाठी व्यापक धोरण राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत या धोरणांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी



इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. आगामी मंत्रिमंडळ बैठकीत या दोन्ही धोरणांना अंतिम मंजुरी दिली जाणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, संशोधन, नवोन्मेष, गुंतवणूक आणि उच्च कौशल्याधारित रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी ही धोरणे अत्यंत महत्त्वाची ठरणार आहेत. महाराष्ट्राला जागतिक तंत्रज्ञान केंद्र म्हणून विकसित करण्याच्या राज्य सरकारच्या व्यापक दृष्टीकोनाचा हा महत्त्वाचा भाग आहे. क्वांटम तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, प्रगत संगणन, रोबोटिक्स, सेमिकंडक्टर, सायबर सुरक्षा, जैवतंत्रज्ञान आणि इतर उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रांना प्रोत्साहन देण्यासाठी डीप टेक धोरणाची आखणी करण्यात आली आहे. यामुळे संशोधन संस्थांना, स्टार्टअप्सना आणि उद्योगांना सक्षम व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

राज्यात उच्च तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणूक आकर्षित करणे, जागतिक दर्जाची संशोधन परिसंस्था निर्माण करणे, नवोन्मेषाला चालना देणे आणि मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती करणे हे या धोरणांचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

विशेषतः युवकांसाठी उच्च कौशल्याधारित रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होणार असल्याचे सरकारचे मत आहे. या धोरणांच्या अंमलबजावणीमुळे महाराष्ट्र केवळ देशातच नव्हे तर जागतिक स्तरावरही तंत्रज्ञान आणि नवोन्मेष क्षेत्रातील एक महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास येईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

### रिझर्व्ह बँकेकडील सोने पूर्णपणे सुरक्षित

# विक्रीच्या अफवा बँकेने फेटाळून लावल्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) देशाच्या सोन्याच्या साठ्याबाबत पसरलेल्या अफवांचे खंडन करत आपल्या भौतिक सोन्याच्या साठ्यात कोणताही बदल झालेला नसल्याचे स्पष्ट केले आहे. आरबीआयने जारी केलेल्या अधिकृत निवेदनानुसार, केंद्रीय बँकेकडे सध्या ८८०.५२ टन इतका सोन्याचा भौतिक साठा असून तो पूर्वीप्रमाणेच कायम आहे.




गेल्या काही दिवसांत काही माध्यमे आणि सामाजिक माध्यमांवर आरबीआयने आपल्या सोन्याच्या साठ्यातील काही हिस्सा विकल्याच्या बातम्या प्रसारित होत होत्या. या वृत्तांमुळे आर्थिक क्षेत्रात विविध चर्चा आणि शंका निर्माण झाल्या होत्या. मात्र, केंद्रीय बँकेने या सर्व दाव्यांना पूर्णपणे खोटे आणि निराधार ठरविले आहे.

आरबीआयने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, काही माध्यमांमध्ये केंद्रीय बँकेने सोने विकल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, रिझर्व्ह बँकेने आपल्या साठ्यातील कोणत्याही सोन्याची विक्री केलेली नाही. त्यामुळे अशा वृत्तांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही करण्यात आले आहे. सोन्याच्या साठ्याबाबत पारदर्शकता राखण्यासाठी आरबीआय दर महिन्याला 'आरबीआय बुलेटिन' प्रकाशित करते. या बुलेटिनमध्ये देशाचा परकीय चलन साठा आणि सोन्याच्या साठ्याची अधिकृत माहिती जाहीर केली जाते. ताज्या आकडेवारीनुसार, देशाचा सोन्याचा साठा ८८०.५२ टनांवर स्थिर आहे.

आरबीआयने नागरिक, गुंतवणूकदार आणि आर्थिक क्षेत्रातील संबंधितांना केवळ अधिकृत स्रोतांवरच विश्वास ठेवण्याचे आवाहन केले आहे. सामाजिक माध्यमांवरील अपुष्ट माहिती किंवा अफवांच्या आधारे निष्कर्ष काढू नयेत, असेही केंद्रीय बँकेने स्पष्ट केले.

दरम्यान, सोन्याच्या वाढत्या आयातीवर नियंत्रण मिळवण्यासाठी केंद्र सरकारने अलीकडेच सोने आणि चांदीवरील आयात शुल्कात मोठी वाढ केली आहे. हे शुल्क ६ टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आले आहे.

### पंतप्रधान मोदी एक वर्षच पदावर

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी वर्षभरही पंतप्रधानपदावर कायम राहणार नाहीत, असा दावा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बुधवारी केला. येथील इंदिरा भवन येथे आदिवासी काँग्रेसने आयोजित केलेल्या कार्यक्रमात देशभरातील आदिवासी नेत्यांना संबोधित करताना राहुल गांधी म्हणाले की, "आर्थिक त्सुनामी" येत असताना, जनतेच्या दबावामुळे व्यवस्थाही बंडखोर होत आहे. एकेकाळी मोदींच्या नियंत्रणाखाली असलेली यंत्रणा कोलमडून पडत आहे आणि आता पंतप्रधान आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांची माहिती त्यांना पुरवत आहे, असा दावाही राहुल गांधी यांनी यावेळी केला.

# अभिषेक बॅनर्जींना ईडीचे समन्स

### पश्चिम बंगाल शिक्षक भरती घोटाळा प्रकरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगालमधील कथित प्राथमिक शिक्षक भरती घोटाळा प्रकरणात तृणमूल काँग्रेसचे नेते आणि खासदार अभिषेक बॅनर्जी यांना अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) समन्स बजावले आहे. १५ आणि १६ जून रोजी चौकशीसाठी हजर राहण्याचे निर्देश ईडीने दिल्याने राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्राथमिक शिक्षक भरती घोटाळ्याशी संबंधित आर्थिक व्यवहार आणि इतर बाबींविषयी चौकशी करण्यासाठी ईडीचे पथक अभिषेक बॅनर्जी यांच्या निवासस्थानी पोहोचले होते. त्यानंतर त्यांना चौकशीसाठी समन्स बजावण्यात आले.

अभिषेक बॅनर्जी यांच्यावर काही दिवसांपूर्वी भाजप कार्यकर्त्यांकडून हल्ला झाल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यानंतर आता ईडीच्या कारवाईमुळे तृणमूल काँग्रेस आणि भाजप यांच्यातील राजकीय संघर्ष आणखी तीव्र झाला आहे. मात्र, या प्रकरणी ईडी किंवा अभिषेक बॅनर्जी यांच्या कार्यालयाकडून अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

दरम्यान, पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या राजकीय घडामोडींना आणखी वेग आला आहे. तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत मतभेदांमुळे पक्षात मोठी फूट पडल्याचे चित्र निर्माण झाले आहे. विधानसभा अध्यक्ष रथीनद्रनाथ बोस यांनी पक्षातील बंडखोर गटाला मान्यता दिल्याची चर्चा सुरू असून त्यामुळे मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासमोरील राजकीय आव्हाने वाढली आहेत.

शिक्षक भरती घोटाळा, पक्षातील अंतर्गत संघर्ष आणि ईडीची कारवाई या घडामोडींमुळे पश्चिम बंगालचे राजकारण सध्या मोठ्या उलथापालथीच्या टप्प्यावर पोहोचले आहे.

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे निर्देश

# महिला खेळाडूंसाठी अत्याधुनिक सुविधा पुरवा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यातील महिला खेळाडूंना अधिक सुरक्षित, सन्मानजनक आणि प्रोत्साहनपर वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्यातील सर्व क्रीडांगणांवर मॉडेल स्वच्छतागृहे, स्वतंत्र चेंजिंग रूम, पुरेशी प्रकाशयोजना आणि सीसीटीव्ही सुरक्षा व्यवस्था उभारण्यासाठी राज्यस्तरीय एकसंध धोरण तयार करण्यात येणार असल्याचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा क्रीडामंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले.



राज्यातील क्रीडांगणांवर महिला खेळाडूंना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासंदर्भातील विधानसभेतील आश्वासनाच्या अनुषंगाने या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार मिलिंद नार्वेकर, आमदार चित्रा वाघ, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा, क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, क्रीडा आयुक्त दीपक सिंगला यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी सुनेत्रा पवार म्हणाल्या की, महाराष्ट्रातील महिला खेळाडू राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश मिळवत आहेत. त्यांच्या सहभागात आणि कामगिरीत अधिक वाढ होण्यासाठी सुरक्षित आणि दर्जेदार पायाभूत सुविधा आवश्यक आहेत. त्यामुळे प्रत्येक क्रीडांगणावर महिला खेळाडूंसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर राहणार आहे.

त्यांनी सांगितले की, केवळ क्रीडांगणांची उभारणी पुरेशी नाही, तर दर्जेदार प्रशिक्षण, आर्थिक पाठबळ, पोषण, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, सुरक्षित वातावरण आणि सामाजिक स्वीकार या बाबीही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. राज्य सरकार नव्या क्रीडा धोरणातून खेळाडूकेंद्रित दृष्टिकोन स्वीकारत असून ग्रामीण भागापासून आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत खेळाडूंना संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत.

राज्यातील सर्व क्रीडांगणांवर महिला खेळाडूंना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे आणि यासाठी सविस्तर कृती आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

बैठकीत राज्यातील विविध क्रीडांगणांवरील महिला खेळाडूंसाठी उपलब्ध सुविधांची सद्यस्थिती, आवश्यक सुधारणा आणि भविष्यातील नियोजन यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. महिला खेळाडूंना अधिक सुरक्षित आणि सक्षम वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार यावेळी करण्यात आला.

# कुवेतवरील इराणी हल्ल्यात भारतीयाचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कुवेत** : कुवेत आंतरराष्ट्रीय विमानतळावर झालेल्या इराणी क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यात एका भारतीय नागरिकाचा मृत्यू झाला असून ६३ जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. कुवेतमधील भारतीय दूतावासाने भारतीय नागरिकाच्या मृत्यूला दुजोरा दिला असून या घटनेमुळे आखाती प्रदेशातील तणाव पुन्हा वाढला आहे.


भारतीय दूतावासाने मृत भारतीय नागरिकाच्या कुटुंबीयांशी संपर्क साधला असून आवश्यक मदत आणि सहाय्य पुरविण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले आहे.

कुवेतच्या आरोग्य मंत्रालयाच्या माहितीनुसार, हल्ल्यात विमानतळ कर्मचारी, प्रवासी आणि इतर नागरिक जखमी झाले आहेत. इराणी ड्रोन आणि क्षेपणास्त्रांमुळे विमानतळावरील काही सुविधा तसेच राजनैतिक इमारतींचे नुकसान झाले आहे. हल्ल्यानंतर कुवेत आंतरराष्ट्रीय विमानतळावरील उड्डाण सेवा तात्पुरती बंद करण्यात आली होती. नंतर परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर आणि सुरक्षा उपाययोजना वाढविल्यानंतर कुवेत एअरवेजने टर्मिनल-४ मधून मर्यादित स्वरूपात विमानसेवा पुन्हा सुरू केल्याची घोषणा केली.

दरम्यान, इराणने कुवेतबरोबरच बहरीनमधील काही लक्ष्यांवरही क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले केल्याचा दावा केला आहे. बहरीनमधील अमेरिकेच्या पाचव्या नौदल तळासह काही लष्करी ठिकाणांना लक्ष्य करण्यात आल्याचे इराणने म्हटले आहे.

## संपादकीय

# लोकशाही आघाडीसमोरील मोठे आव्हान!



**'क्वाड' समूह आणि आशियातील मध्यम सत्ताधारी देशांसमोरील सद्यस्थितीतील पेचप्रसंग हा जागतिक राजकारणातील अत्यंत कळीचा मुद्दा बनला आहे. अमेरिका आणि चीन यांच्यातील वाढत्या संघर्षात भरडले न जाता स्वतःची सामरिक स्वायत्तता आणि आर्थिक हितसंबंध कसे जोपासायचे, हे या सर्वच देशांसमोरील एक मोठे समान आव्हान आज उभे आहे.**

आजचे जागतिक राजकारण हे शीतयुद्धाच्या काळासारखे दोन स्पष्ट गटांमध्ये विभागलेले नाही. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात अमेरिका किंवा सोव्हिएत युनियन यांपैकी एकाची निवड करणे जगातील अनेक देशांसाठी तुलनेने सोपे होते. पण आता परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. आशिया-प्रशांत (इंडो-पॅसिफिक) क्षेत्र हे आजच्या घडीला जागतिक अर्थकारणाचे आणि राजकारणाचे मुख्य इंजिन बनले आहे. या क्षेत्रात चीनची आर्थिक आणि लष्करी ताकद ज्या अफाट वेगाने वाढत आहे, ती पाहता परिसरातील अनेक छोट्या आणि मध्यम देशांच्या मनात असुरक्षिततेची मोठी भावना निर्माण झाली आहे. या वाढत्या चिनी प्रभावाला आणि आक्रमक विस्तारवादाला वेळीच आळा घालण्यासाठी भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया या चार प्रमुख लोकशाही देशांनी एकत्र येऊन 'क्वाड' या धोरणात्मक गटाची स्थापना केली. परंतु, इंडो-पॅसिफिक क्षेत्रात या चार देशांव्यतिरिक्त आसियान समूहातील दहा सदस्य देश, दक्षिण कोरिया आणि इतर अनेक 'मध्यम सत्ताधारी' (मिडल पॉवर्स) देश वसलेले आहेत. या मध्यम देशांची भूमिका आणि त्यांचा परराष्ट्र धोरणातील पेचप्रसंग आजच्या अस्थिर जागतिक व्यवस्थेत सर्वात महत्त्वाचा आणि निर्णायक ठरणार आहे. या मध्यम सत्ताधारी देशांसमोरील सर्वात मोठा आणि कळीचा पेच हा त्यांच्या राष्ट्रीय सुरक्षेचा आणि अर्थव्यवस्थेचा आहे. या सर्व देशांची अर्थव्यवस्था चीनवर प्रचंड मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. चीन हा त्यांच्यासाठी सर्वात मोठा व्यापारी भागीदार, कच्च्या मालाचा पुरवठादार आणि पायाभूत सुविधांमधील गुंतवणुकीचा मुख्य स्रोत आहे. त्यामुळे सुरक्षेसाठी अमेरिकेसोबत जायचे की आर्थिक फायद्यासाठी चीनला खूश ठेवायचे, या दुहेरी कोंडीत हे देश सापडले आहेत. 'क्वाड' गटामध्ये भारताची भूमिका या सर्व पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाची, समतोल राखणारी आणि वेगळी ठरते. अमेरिका आणि जपान हे जरी भारताचे अत्यंत जवळचे मित्र असले, तरी भारताला कोणत्याही एका गटाच्या दावणीला कायमस्वरूपी बांधले जाणे कधीही मान्य नसते. भारताने नेहमीच आपली सामरिक स्वायत्तता अत्यंत कठोरपणे जपली आहे. ग्लोबल साऊथचा आवाज म्हणून भारत आज जागतिक पटलावर उभा आहे. त्यामुळे आसियान देश आणि इतर मध्यम सत्ताधारी देशांच्या या कोंडीची भारताला सर्वात अचूक आणि जवळून जाणीव आहे. या मध्यम देशांचा विश्वास जिंकायचा असेल, तर 'क्वाड'ला त्यांच्या आर्थिक आणि विकासात्मक गरजा पूर्ण करण्यासाठी प्रत्यक्ष पुढाकार घ्यावा लागेल. अत्याधुनिक तंत्रज्ञान हस्तांतरण, कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर निर्मिती, हवामान बदलावरील उपाययोजना, सागरी सुरक्षेसाठी माहितीची देवाणघेवाण आणि नैसर्गिक आपत्तीच्या वेळी तत्पर मदत, अशा अत्यंत सकारात्मक आणि लोकोपयोगी मुद्द्यांवर 'क्वाड'ने आता आपले लक्ष केंद्रित केले पाहिजे. चीनच्या 'बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह' या विकसनशील देशांना कर्जबाजारी करणाऱ्या धोरणाला एक भक्कम आणि पारदर्शक आर्थिक पर्याय उभा करून देणे, हे 'क्वाड'चे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे. जागतिक पुरवठा साखळी अधिक सुरक्षित करून ती या मध्यम देशांमध्ये नव्याने विकसित केल्यास, त्यांचे चीनवरील आर्थिक अवलंबित्व नक्कीच लक्षणीयरीत्या कमी होऊ शकेल. आशिया-प्रशांत क्षेत्रातील भविष्यातील शांतता आणि राजकीय स्थैर्य हे या मध्यम सत्ताधारी देशांच्या भूमिकेवर पूर्णपणे अवलंबून असणार आहे. त्यांना कोणत्याही एका गटात जाण्याची सक्ती करण्याऐवजी, त्यांच्या स्वतंत्र अस्तित्वाचा आणि विकासाच्या गरजांचा आदर करणे शहाणपणाचे ठरेल. 'क्वाड' गटाने या देशांसाठी मजबूत आधारस्तंभ म्हणून उभे राहायला हवे, त्यांना चीनविरोधातील साधे प्यादे बनवू नये. भारत या राजनैतिक प्रक्रियेत नैसर्गिक आणि विश्वासार्ह दुवा म्हणून निश्चितच काम करू शकतो. सुरक्षेची भक्कम हमी आणि आर्थिक प्रगतीचा शाश्वत मार्ग या दोन्ही गोष्टींची सांगड घालून दिली, तरच या मध्यम देशांचा पेचप्रसंग सुटेल. इंडो-पॅसिफिक क्षेत्राला कोणत्याही एका महासत्तेच्या अमर्याद वर्चस्वाखाली जाण्यापासून रोखण्यासाठी लोकशाही राष्ट्रांची ही भक्कम आणि विधायक एकजूट हाच आजच्या काळातील सर्वोत्तम पर्याय आहे.

# 'वर्क फ्रॉम होम' : सवलत नव्हे, तर अनिवार्य गरज!



कोरोना महामारीच्या काळात संपूर्ण जगाने अचानक 'वर्क फ्रॉम होम' अर्थात घरून काम करण्याच्या पद्धतीचा स्वीकार केला. त्यावेळी तो एक जागतिक नाईलाज होता. पण आता परिस्थिती पूर्वपदावर आल्यानंतर अनेक कंपन्या आणि त्यांचे जुन्या विचारांचे व्यवस्थापन कर्मचाऱ्यांना पुन्हा कार्यालयात बोलावण्यासाठी आग्रही दिसत आहेत. अनेक बड्या कॉर्पोरेट कंपन्यांनी आठवड्यातील पाचही दिवस कार्यालयात येणे सक्तीचे केले आहे. या पार्श्वभूमीवर 'वर्क फ्रॉम होम' ही संकल्पना आणि तिचे अर्थशास्त्र नव्याने समजून घेणे आवश्यक ठरते. ही पद्धत आता नोकरदारांसाठी मिळणारी एखादी चैनीची सवलत राहिलेली नाही. ती आजच्या धावपळीच्या आणि वाढत्या गुंतागुंतीच्या जीवनातील एक अत्यंत महत्त्वाची गरज बनली आहे. या नव्या आणि प्रगत बदलाला विरोध करण्याऐवजी तो खुल्या मनाने स्वीकारणे अधिक शहाणपणाचे ठरेल.

सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कर्मचाऱ्यांची उत्पादकता आणि त्यांचा वाया जाणारा मौल्यवान वेळ. भारतातील मुंबई, बेंगळुरू, दिल्ली किंवा पुणे यांसारख्या मोठ्या महानगरांमध्ये कर्मचाऱ्यांचा दररोजचा दोन ते तीन तासांचा वेळ निव्वळ प्रवासात आणि वाहतूक कोंडीत वाया जातो. हा वेळ अत्यंत अनुत्पादक असतो आणि तो कर्मचाऱ्यांची शारीरिक व मानसिक ऊर्जा पूर्णपणे शोषून घेतो. जर हाच वेळ वाचवून कर्मचाऱ्याला घरून काम करण्याची मुभा दिली, तर त्याची कामातील एकाग्रता आणि उत्पादकता नक्कीच वाढते, हे अनेक जागतिक सर्वेक्षणांमधून वारंवार सिद्ध झाले आहे. घरून काम केल्यामुळे कर्मचाऱ्यांना आपले वैयक्तिक आयुष्य, कौटुंबिक स्वास्थ्य आणि कार्यालयीन जबाबदाऱ्या यांत उत्तम समतोल साधता येतो. वाढत्या मानसिक ताणतणावाच्या आजच्या युगात हा समतोल अत्यंत मोलाचा आहे. कर्मचाऱ्यांचे मानसिक समाधान हीच खऱ्या अर्थाने कोणत्याही कंपनीच्या यशाची आणि प्रगतीची पहिली पायरी असते.

याशिवाय, 'वर्क फ्रॉम होम'चे आर्थिक आणि पर्यावरणीय फायदे खूप मोठे तसेच दूरगामी आहेत. बहुतांश कर्मचारी घरून काम करत असतील, तर रस्त्यांवरील वाहनांची संख्या आपोआप कमी होईल. यामुळे शहरांमधील वाहतूक कोंडी सुटेल, प्रदूषणाची पातळी खाली येईल आणि देशाच्या इंधनावरील खर्चात मोठी बचत होईल. परकीय चलनाची मोठी गंगाजळी इंधन आयातीवर खर्च होते, ती वाचल्यास राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला मोठा फायदा होऊ शकतो. कंपन्यांच्या दृष्टीने विचार केल्यास, त्यांना मोठ्या आणि आलिशान कार्यालयांची, तसेच त्यावरील भरमसाट खर्चाची अजिबात आवश्यकता भासणार नाही. वीज, इंटरनेट, महागडी जागा आणि इतर अनेक कार्यालयीन सुविधांवर दरवर्षी होणारा कोट्यवधी रुपयांचा अवाढव्य खर्च सहज वाचवता येऊ शकतो. हाच वाचलेला पैसा कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांच्या विकासावर आणि नवीन तंत्रज्ञानाच्या संशोधनावर अधिक चांगल्या प्रकारे खर्च करू शकतात, ज्यामुळे एकूणच अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल.

सामाजिक समावेशकतेच्या दृष्टीनेही ही आधुनिक कार्यपद्धती एक मोठी आणि सकारात्मक क्रांती आहे.

**» 'वर्क फ्रॉम होम' ही संकल्पना आता कर्मचाऱ्यांची कोणतीही साधी सवलत उरलेली नाही. ती आधुनिक अर्थव्यवस्थेची, तसेच बदलत्या कार्यसंस्कृतीची अत्यंत महत्त्वाची आणि अनिवार्य गरज बनली आहे.**

शारीरिकदृष्ट्या दिव्यांग असलेल्या व्यक्तींना दररोज गर्दीतून प्रवास करणे शक्य नसते, त्यांच्यासाठी ही पद्धत खऱ्या अर्थाने एक मोठे वरदान ठरली आहे. सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे, यामुळे छोट्या शहरांमधील टॅलेंटला थेट जागतिक पातळीवर काम करण्याची सुवर्णसंधी मिळते. टियर-दोन आणि टियर-तीन शहरांमधून मोठ्या महानगरांकडे रोजगारासाठी होणारे तरुणांचे विनाकारण स्थलांतर थांबवणे शक्य होते. यामुळे महानगरांवरील लोकसंख्येचा आणि पायाभूत सुविधांवरील प्रचंड ताण कमी होण्यास मोठी मदत मिळू शकेल. तरीही अनेक व्यवस्थापक आपल्या जुन्या कार्यपद्धतीला घट्ट चिकटून आहेत.

कर्मचाऱ्यांवर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवण्याची पारंपरिक सवय आणि मोठ्या इमारतींमध्ये अडकलेली प्रचंड गुंतवणूक, या दोन प्रमुख कारणांमुळे कंपन्या 'रिटर्न टू ऑफिस'चा अट्टाहास धरत आहेत. पण, कामाचे मोजमाप हे कर्मचाऱ्याने कार्यालयात किती तास व्यतीत केले यावरून न करता, त्याने दिलेल्या प्रत्यक्ष आउटपुटवरून व्हायला हवे. कर्मचाऱ्यांवर अविश्वास दाखवणे हे कंपनीच्या प्रगतीसाठी मारक ठरू शकते. 'वर्क फ्रॉम होम' किंवा 'हायब्रिड' मॉडेल हे भविष्यातील कामाचे शाश्वत स्वरूप आहे. आधुनिक तंत्रज्ञानाने भौगोलिक मर्यादा कधीच पुसून टाकल्या आहेत. आता गरज आहे ती जुन्या मानसिकतेच्या मर्यादा कायमच्या पुसून टाकण्याची. या बदलाचा स्वीकार केल्यासच प्रगतीची नवी दारे उघडतील.

# भामा-आसखेड जलवाहिनी प्रकल्प पुन्हा एकदा रखडला

## इंद्रायणीतील कामावर पावसाचे सावट; मुदतवाढ देऊनही प्रकल्पाला गती नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहराची वाढती पाण्याची गरज भागविण्यासाठी महापालिकेच्या वतीने राबविण्यात येणारा महत्त्वाकांक्षी भामा-आसखेड जलवाहिनी प्रकल्प पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या या प्रकल्पाचे काम अद्याप पूर्ण झाले नसल्याने शहरवासीयांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. अनेक भागांत नागरिकांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत असून, वारंवार मुदतवाढ देऊनही प्रकल्पाला अपेक्षित गती मिळत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

भामा-आसखेड धरणातून पिंपरी-चिंचवडला अतिरिक्त पाणीपुरवठा करण्यासाठी जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. या प्रकल्पातील सर्वात महत्त्वाचा आणि तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक टप्पा म्हणजे देहू येथील इंद्रायणी नदीपात्रातून जलवाहिनी नेण्याचे काम. सध्या नदीपात्रात सुमारे ११० मीटर लांबीच्या भागात मातीचा भराव टाकून भूमिगत पाइपलाइन टाकण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. नदीतील पाण्याच्या पातळीपासून जवळपास २५ फूट खाली जाऊन हे काम करण्यात येत आहे. मात्र, जून महिन्याच्या प्रारंभीच मान्सूनपूर्व पावसाची चाहूल लागल्याने या कामासमोर नवे संकट उभे राहिले आहे. पावसाळ्यात इंद्रायणी नदी दुथडी भरून वाहते. त्यामुळे पुढील काही दिवसांत पावसाचा जोर वाढल्यास नदीपात्रातील काम थांबण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नागरिकांमध्येही याबाबत चिंता वाढली असून, सध्या सुरू असलेला मातीचा भराव वाहून जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

गतवर्षीही याच ठिकाणी अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. पावसामुळे नदीतील पाण्याची पातळी वाढल्याने भराव वाहून गेला आणि कामाला मोठा फटका बसला होता. परिणामी प्रकल्पाची मुदत आणखी लांबली. यंदाही त्याची पुनरावृत्ती होणार का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

या प्रकल्पासाठी यापूर्वी नियुक्त करण्यात आलेल्या ठेकेदाराकडून काम पूर्ण होऊ शकले नव्हते. त्यामुळे उर्वरित सुमारे ३० टक्के कामासाठी नव्याने निविदा प्रक्रिया राबवून नवीन ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आली. १० एप्रिल रोजी नव्या ठेकेदाराला कार्यादेश देण्यात आला असून नऊ महिन्यांत संपूर्ण काम पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

भामा-आसखेड प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पिंपरी-चिंचवड शहराला दीर्घकालीन पाणीपुरवठ्याचा मोठा आधार मिळणार आहे. वाढती लोकसंख्या आणि विस्तारत असलेल्या शहराच्या गरजा लक्षात घेता हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. परंतु वारंवार होणारा विलंब, बदलणारे ठेकेदार आणि पावसामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी यामुळे प्रकल्पाच्या भवितव्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पावसाळा तोंडावर असताना इंद्रायणी नदीपात्रातील हे काम वेळेत पूर्ण होते की पुन्हा एकदा रखडते, याकडे आता संपूर्ण शहराचे लक्ष लागून आहे.

# दोन महिन्यांत २८० कोटींच्या मालमत्ताकराची वसुली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या करसंकलन विभागाने चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यांत मालमत्ताकर वसुलीत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. एप्रिल आणि मे महिन्यात मिळून तब्बल २८० कोटी २४ लाख रुपयांचा मालमत्ताकर जमा झाला असून २ लाख ७१ हजार ५ नागरिकांनी कराचा भरणा केला आहे. वाकड विभागीय कार्यालयाने सर्वाधिक ४० कोटी रुपयांची वसुली करत अव्वल स्थान पटकावले आहे.

महापालिका हद्दीत निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मिश्र वापराच्या तसेच मोकळ्या जागांसह एकूण ७ लाख ४४ हजार ६३० नोंदणीकृत मालमत्ता आहेत. महिलांच्या नावावरील मालमत्ता, दिव्यांग तसेच पर्यावरणपूरक गृहनिर्माण संस्थांना विविध करसवलती दिल्या जात आहेत. ऑनलाइन पद्धतीने कर भरल्यास १० टक्के सवलतीचा लाभ मिळत आहे. महापालिकेच्या आकडेवारीनुसार, १ एप्रिल ते ३१ मे या कालावधीत निवासी मालमत्ताधारकांनी सर्वाधिक १९२ कोटी रुपयांचा कर भरला आहे. बिगरनिवासी मालमत्ताधारकांकडून ५३ कोटी ८७ लाख रुपये, मिश्र मालमत्ताधारकांकडून १६ कोटी रुपये, तर इतर मालमत्ताधारकांकडून १९ कोटी रुपयांचा कर जमा झाला आहे.

# सोसायट्यांना सीपीसीबी पोर्टलवर नोंदणी अनिवार्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील मोठ्या हाऊसिंग सोसायट्या, हॉटेल्स, मॉल्स, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, मंगल कार्यालये, वसतीगृहे, कॅन्टीन तसेच विविध व्यावसायिक आस्थापनांसाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या नियमांचे पालन न करणाऱ्या सोसायट्या व आस्थापनांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली.



घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ अंतर्गत मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या संस्थांसाठी ही नोंदणी सक्तीची करण्यात आली आहे. कचरा निर्मिती, त्याचे विलगीकरण आणि प्रक्रिया यावर केंद्रीकृत पद्धतीने देखरेख ठेवण्यासाठी सीपीसीबीने विशेष ऑनलाईन पोर्टल कार्यान्वित केले आहे. महापालिकेच्या माहितीनुसार, मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या सोसायट्या आणि आस्थापनांनी स्वतःच्या परिसरातच कचऱ्याचे वर्गीकरण आणि प्रक्रिया करणे बंधनकारक आहे. विशेषतः ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत निर्मितीसाठी आवश्यक यंत्रणा उभारणे आणि ती कार्यान्वित ठेवणे आवश्यक राहणार आहे. या प्रक्रियेची माहिती सीपीसीबीच्या पोर्टलवर नोंदविणे ही संबंधित संस्थांची कायदेशीर जबाबदारी आहे.

डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले की, घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी आणि शाश्वत करण्यासाठी ही व्यवस्था लागू करण्यात आली आहे. शहरातील वाढत्या कचऱ्याच्या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या संस्थांनी स्वतःची जबाबदारी पार पाडणे गरजेचे आहे. पर्यावरण संरक्षण आणि स्वच्छ शहर उपक्रमाला चालना देण्यासाठी या नियमांची कठोर अंमलबजावणी करण्यात येणार आहे. महापालिकेने सर्व पात्र हाऊसिंग सोसायट्या आणि व्यावसायिक आस्थापनांना तातडीने ऑनलाईन नोंदणी पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्था, सोसायट्या किंवा आस्थापनांविरुद्ध घनकचरा व्यवस्थापन नियमांनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

# भरधाव दुचाकी बसथांब्याच्या भिंतीवर आदळली

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** पिंपरी-चिंचवडमधील सांगवी परिसरात भरधाव वेगाने जात असलेल्या दुचाकीचा भीषण अपघात होऊन चालकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या प्रकरणी सांगवी पोलिस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा अपघात १ जून रोजी रात्री साडेअकरा ते २ जूनच्या पहाटे १२.४० वाजण्याच्या सुमारास पी. के. चौकाजवळील विश्वशांती कॉलनी येथील बीआरटी बसथांबा परिसरात घडला. संकेत प्रभाकरराव गुंजकर (रा. पुणे, मूळ रा. संभाजीनगर) हे त्यांच्या बजाज पल्सर (एमएच-१२ एमसी-५७३२) या दुचाकीवरून नाशिक फाटा ते कोकणे चौक मार्गे जात होते.

यावेळी त्यांनी दुचाकी भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे दुचाकी थेट बीआरटी बसथांब्याच्या भिंतीवर जोरात आदळली. या भीषण धडकेत संकेत गुंजकर गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी हलविण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. अपघातात दुचाकीचेही मोठे नुकसान झाले आहे.

याप्रकरणी लोकेश अच्युतराव साळापुरे (वय ३३) यांनी सांगवी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक जावळे पुढील तपास करीत आहेत.

### जुन्या वादातून जीवघेणा हल्ला

**खेड :** खेड तालुक्यातील मरकळ गावात जुन्या वादाच्या कारणावरून तरुणांवर कोयता आणि लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी आळंदी पोलिसांनी सहा जणांविरुद्ध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १ जून रोजी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास मरकळ येथील कमळजाई वस्ती परिसरात हा प्रकार घडला. याप्रकरणी ज्ञानेश्वर महादेव पाचपुते (वय २२, रा. मरकळ) यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादीनुसार, बजरंग बाळासाहेब टाकळकर, निखिल धर्मराज टाकळकर, विलास तुकाराम टाकळकर, प्रज्वल ज्ञानेश्वर टाकळकर, अभिषेक राजेंद्र लोखंडे आणि पंकज भाऊसाहेब साळुंखे यांनी पूर्वीच्या वादातून संगनमत करून फिर्यादी व त्यांच्या सहकाऱ्यांवर हल्ला केला. आरोपींनी 'बी.टी. कंपनीच्या नादी लागू नका' असे म्हणत ज्ञानेश्वर पाचपुते, त्यांचे मित्र आणि भाऊ सोन्या पाचपुते यांना कोयता व लोखंडी रॉडसारख्या घातक शस्त्रांनी मारहाण केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात संबंधितांना दुखापत झाली असून परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी बीएनएसच्या विविध कलमांसह आर्म्स अ‍ॅक्ट आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. आरोपी प्रज्वल टाकळकर याला अटक करण्यात आली असून इतर आरोपींचा शोध सुरू आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव करीत आहेत.

### स्पा सेंटरच्या नावाखाली देहव्यापार

**पुणे :** वाकड पोलिसांनी स्पा सेंटरच्या आड सुरू असलेल्या कथित देहव्यापार रॅकेटचा पर्दाफाश करत एका महिलेला अटक केली आहे. या कारवाईत दोन महिलांची सुटका करण्यात आली असून संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी १ जून रोजी रात्री वाकड-हिंजवडी रोडवरील 'झेन स्पा' येथे छापा टाकला. तपासादरम्यान स्पा सेंटरच्या नावाखाली महिलांना पैशांचे आमिष दाखवून देहव्यवसाय करण्यास भाग पाडले जात असल्याचे उघड झाले. या प्रकरणी स्वाती सत्यदेव खंडारे (वय ३४, रा. पुनावळे) हिला अटक करण्यात आली आहे. तिच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १४३(३) तसेच अनैतिक मानवी वाहतूक (प्रतिबंध) अधिनियम १९५६ मधील कलम ३, ४, ५ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वादातून सिमेंटच्या गट्टूयाने हल्ला; तरुण जखमी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** किरकोळ वादाचे रूपांतर हाणामारीत होऊन एका तरुणावर सिमेंटच्या गट्टूयाने हल्ला करण्यात आल्याची घटना पिंपरी परिसरात घडली. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून पिंपरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३१ मे रोजी रात्री सुमारे १०.३५ वाजता युगांतर चौक, भाटनगर येथे हा प्रकार घडला. फिर्यादी सूरज रमेश सरवदे (वय ३२) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा मित्र कुणाल संतोष ठाकूर याला आरोपी हितेश राकेश वाल्मिकी मारहाण करत होता.



सूरज सरवदे यांनी मध्यस्थी करून मित्राला तेथून घरी घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. याचा राग मनात धरून आरोपीने जवळ पडलेला सिमेंटचा गट्टा उचलून फिर्यादीच्या तोंडावर मारला. या हल्ल्यात त्यांचा एक दात पडला असून ओठालाही गंभीर दुखापत झाली आहे. पिंपरी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### कौटुंबिक वादातून दुहेरी हत्याकांड

**पुणे** : पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात कौटुंबिक वादाचे भीषण रूप समोर आले असून एका व्यक्तीने स्वतःच्या वडिलांसह भावाची हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या दुहेरी हत्याकांडामुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून ओतूर पोलिसांनी संशयिताला ताब्यात घेऊन तपास सुरू केला आहे. मृतांमध्ये जयराम महादू मुकणे (वय ६०) आणि त्यांचा मुलगा राजेंद्र जयराम मुकणे (वय २७) यांचा समावेश आहे. प्राथमिक माहितीनुसार, जयराम मुकणे यांचा दुसरा मुलगा बाबजी जयराम मुकणे याने दगडाने हल्ला करून दोघांची हत्या केल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतले असून शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले आहेत. संशयित बाबजी मुकणे याला ताब्यात घेण्यात आले असून त्याची कसून चौकशी सुरू आहे. प्राथमिक तपासात कौटुंबिक वाद आणि मालमत्तेशी संबंधित कारणांमुळे हा प्रकार घडला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

### कोरेगाव परिसरात बिबट्याचा धुमाकूळ

**पुणे** : कोरेगाव मूळ (ता. हवेली) व आसपासच्या परिसरात गेल्या दोन महिन्यांपासून बिबट्याने धुमाकूळ घातला असून, वन्यप्राण्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे शेतकरी आणि ग्रामस्थ अत्यंत भयभीत झाले आहेत. बिबट्याने थेट शेतकऱ्यांच्या पशुधनाला (गायी, वासरे, शेळ्या) लक्ष्य करण्यास सुरुवात केल्याने मोठे आर्थिक नुकसान होत आहे. या नरभक्षक बिबट्याचा तात्काळ बंदोबस्त करण्यासाठी कोरेगाव मूळ ग्रामपंचायतीच्या प्रशासक राधिका काकडे यांनी शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे, शिरूर-हवेलीचे आमदार माउली आबा कटके आणि वानवडी वनपरिक्षेत्र अधिकारी यांना लेखी निवेदन देऊन तातडीने पिंजरा लावण्याची मागणी केली आहे.

---

धरणग्रस्तांच्या आठवणींना पुन्हा उजाळा

# डिंभेतून आंबेगाव गावठाण पुन्हा बाहेर

■ दैनिक राज्य लोकतंत्र


छायाचित्र: जयेश शहा

**मंचर** : डिंभे धरणातील पाणीसाठा कमी झाल्यामुळे धरणाच्या पात्रातून उघड पडलेले जुने आंबेगाव गावठाण सध्या धरणग्रस्त ग्रामस्थांच्या भावविश्वाचे केंद्र बनले आहे. पर्यटकांसाठी हे दृश्य ऐतिहासिक आणि निसर्गरम्य वाटत असले, तरी मूळ रहिवाशांसाठी हा क्षण आठवणी, वेदना आणि भावनांचा संगम ठरत आहे. अनेक वर्षांपूर्वी धरणासाठी विस्थापित झालेल्या ग्रामस्थांना आपले जुने गाव पुन्हा पाहण्याची संधी मिळाल्याने त्यांच्या डोळ्यांत आठवणींचे अश्रू तरळत आहेत.

डिंभे धरण उभारणीमुळे अनेक कुटुंबांची घरे, अंगणे, शेतजमिनी आणि सांस्कृतिक वारसा पाण्याखाली गेला. आज पाणी ओसरल्यानंतर गावाचे अवशेष पुन्हा समोर आले आहेत. घरांचे दगडी पाया, जुन्या रस्त्यांचे अवशेष, विहिरी आणि इतर वास्तू पाहून वृद्ध ग्रामस्थ आपल्या मुला-नातवंडांना जुन्या आठवणी सांगताना दिसत आहेत. "इथे आपले घर होते, इथे अंगण होते, इथे आपण खेळायचो," असे सांगताना अनेकांच्या भावना अनावर होत आहेत.

धरणाच्या पात्रातून उघड पडलेली जैन मंदिर, हनुमान मंदिर, विठ्ठल मंदिर आणि महादेव मंदिर ही धार्मिक स्थळे पुन्हा एकदा भक्तांनी गजबजून गेली आहेत. कधीकाळी या मंदिरांमध्ये सण-उत्सव, भजने, कीर्तन आणि धार्मिक कार्यक्रम होत असत. आता अनेक वर्षांनंतर ही मंदिरे पुन्हा पाहायला मिळाल्याने ग्रामस्थ नतमस्तक होत आहेत. मंदिरांचे गाभारे कोरडे झाल्याने भाविक पूजा-अर्चा आणि आरती करताना दिसत आहेत. जुने आंबेगाव त्या काळातील महत्त्वाची बाजारपेठ आणि परिसराचे प्रमुख केंद्र होते. धरणाच्या पात्रात उघड झालेले जुने रस्ते, विहिरी, तेलाचे घाणे आणि इतर अवशेष पाहून त्या काळातील गजबजलेल्या बाजारपेठेच्या आठवणी पुन्हा जाग्या होत आहेत. जुन्या पिढीसाठी हा काळ पुन्हा अनुभवण्याचा क्षण आहे, तर नव्या पिढीसाठी आपल्या पूर्वजांचे गाव प्रत्यक्ष पाहण्याची दुर्मिळ संधी ठरत आहे. गोष्टींमधून ऐकलेले गाव आज प्रत्यक्ष डोळ्यांसमोर उभे राहिल्याने तरुणांमध्येही उत्सुकता वाढली आहे. अनेक कुटुंबे आपल्या मुलांना गावाचा इतिहास दाखवण्यासाठी धरणाच्या पात्रात भेट देत आहेत. त्यामुळे धरणग्रस्तांसाठी हा अनुभव जणू माहेरी परत आल्यासारखा भावनिक ठरत आहे. मात्र, हा आनंद अल्पकाळच टिकणार आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर धरणातील पाणीपातळी वाढेल आणि हे गाव, मंदिरे तसेच इतिहासाचे अवशेष पुन्हा एकदा पाण्याखाली जातील.

डिंभे धरणासाठी अनेक गावे विस्थापित झाली. शासनाने पुनर्वसनासाठी जमीन आणि गावठाणे उपलब्ध करून दिली असली तरी अनेक धरणग्रस्तांच्या समस्या आजही कायम आहेत. इतरांच्या पाण्याच्या गरजा भागवण्यासाठी स्वतःची घरे, शेती आणि संस्कृती पाण्याखाली सोडणाऱ्या या कुटुंबांना अपेक्षित न्याय मिळाला का, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. विस्थापनानंतरच्या अनेक सामाजिक, आर्थिक आणि मूलभूत प्रश्नांशी धरणग्रस्तांना अजूनही झुंज द्यावी लागत आहे. जुने आंबेगाव पुन्हा दिसू लागल्याने या वेदनादायी वास्तवाचीही पुन्हा एकदा आठवण ताजी झाली आहे.

---

## जिद्दीच्या बळावर सिद्धीची मुंबई पोलिस दलात भरारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी** : आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून आंबेगाव तालुक्यातील मांदळेवाडी या दुष्काळग्रस्त गावातील सिद्धी दादाभाऊ आदक हिने जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर मुंबई पोलिस दलात निवड मिळवली आहे. संपूर्ण तालुक्यातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

सिद्धीचे वडील दादाभाऊ आदक हे शेती आणि प्रसंगी मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. स्वतःचे शिक्षण मर्यादित राहिल्याने आपल्या मुलांनी शिकून स्वबळावर उभे राहावे, हा त्यांचा ध्यास होता. त्याच प्रेरणेतून सिद्धीने कठोर परिश्रम घेत यश संपादन केले. सिद्धीचे इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतचे शिक्षण गावातील प्राथमिक शाळेत झाले. त्यानंतर तिने प्रगती विद्यालय, वडगावपीर येथे आठवी ते दहावीचे शिक्षण पूर्ण केले. अकरावी आणि बारावीचे शिक्षण पाबळ येथील विज्ञान शाखेत घेतल्यानंतर तिने खेड येथील करिअर अकॅडमीमध्ये स्पर्धा परीक्षांचे आणि शारीरिक चाचणीचे खडतर प्रशिक्षण घेतले. या मेहनतीचे फळ तिला पहिल्याच प्रयत्नात मिळाले आणि मुंबई पोलिस दलाची खाकी वर्दी परिधान करण्याचे स्वप्न तिने साकार केले.

आपल्या यशामागे वडील दादाभाऊ आदक, आई प्रमिला आदक, चुलते नवनाथ आदक, चुलती लता आदक तसेच आजी-आजोबा, भाऊ-बहिण आणि कुटुंबीयांचे मोलाचे मार्गदर्शन व पाठबळ लाभल्याचे सिद्धीने सांगितले. सिद्धीच्या या यशाचा आनंद संपूर्ण मांदळेवाडी गावाने साजरा केला.

---

## केळी बागा जमीनदोस्त; लाखोंचे नुकसान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर** : आंबेगाव तालुक्यातील पिंपळगाव (खडकी) परिसरात बुधवारी दुपारी अचानक आलेल्या वादळी वाऱ्याने केळी उत्पादक शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. शेतकरी नवनाथ लक्ष्मण पोखरकर यांच्या सुमारे दोन एकर क्षेत्रातील तर विलास दत्तात्रय पोखरकर यांच्या सहा एकर क्षेत्रातील केळीची बाग पूर्णपणे उध्वस्त झाली. वादळी वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणावर केळीची झाडे कोसळल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले असून वर्षभराची मेहनत वाया गेली आहे.

अचानक आलेल्या वादळामुळे अनेक ठिकाणी केळीची झाडे मुळासकट उन्मळून पडली. उत्पादनासाठी सज्ज असलेल्या बागांचे मोठे नुकसान झाल्याने संबंधित शेतकरी हवालदिल झाले आहेत. नुकसानीचे प्रमाण मोठे असल्याने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

आंबेगाव तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांना पर्याय म्हणून अलीकडच्या काळात केळी लागवडीकडे मोर्चा वळवला होता. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, ठिबक सिंचन व्यवस्था आणि मोठी आर्थिक गुंतवणूक करून उभारलेल्या केळी बागांना या वादळी वाऱ्याचा जबर फटका बसला आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, केळी लागवडीसाठी प्रती एकर सुमारे तीन लाख रुपयांपर्यंत खर्च येतो. खत, औषधे, मजुरी आणि सिंचन यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केल्यानंतर ऐन उत्पादनाच्या टप्प्यावर नैसर्गिक आपत्तीमुळे बागा उद्‌ध्वस्त झाल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे.

महसूल आणि कृषी विभागाने तातडीने घटनास्थळी भेट देऊन पंचनामे करावेत तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून विशेष आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे. वादळी वाऱ्यामुळे झालेल्या या नुकसानीमुळे पिंपळगाव (खडकी) परिसरातील शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

---

## आंबेगाव तालुक्यात चक्रीवादळाचा कहर

घरांचे पत्रे उडाले, वीजपुरवठा खंडित

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील चांडोली बुद्रुक, बेलदत्तवाडी आणि मुक्ताईनगर परिसरात मंगळवारी (दि. २ जून) दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास आलेल्या जोरदार चक्रीवादळाने मोठे नुकसान केले. जवळपास तासभर सुरू असलेल्या वादळामुळे अनेक घरांचे पत्रे उडून गेले, झाडे उन्मळून पडली तसेच विजेचे खांब कोसळल्याने अनेक गावांतील वीजपुरवठा खंडित झाला.

अचानक आलेल्या या वादळामुळे नागरिकांची मोठी धावपळ उडाली. वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की अनेक घरांच्या छतावरील पत्रे हवेत उडून दूरवर जाऊन पडली. काही ठिकाणी गोठ्यांचेही नुकसान झाले असून शेतकरी आणि नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. बेलदत्तवाडी येथील शेतकरी महादू मुरलीधर थोरात यांच्या घरासमोरील पत्रे वादळामुळे उडून गेली. त्यामुळे घरात पावसाचे पाणी शिरून कपडे, धान्य आणि इतर संसारोपयोगी वस्तूंचे नुकसान झाले. त्याचप्रमाणे मुक्ताईनगर येथील एका शेतकऱ्याच्या घरावरील पत्रेही उडून गेल्याने घरातील साहित्य भिजून मोठे नुकसान झाले.

चक्रीवादळाचा फटका स्थानिक व्यावसायिकांनाही बसला. अनेक दुकानांवरील शेड आणि पत्रे उडून गेल्याने मालमत्तेचे नुकसान झाले असून काही ठिकाणी पावसाचे पाणी शिरल्याने माल भिजला आहे. रस्त्यालगतची अनेक झाडे उन्मळून पडल्याने वाहतुकीतही अडथळे निर्माण झाले. वादळामुळे विजेचे अनेक खांब कोसळल्याने चांडोली बुद्रुक, बेलदत्तवाडी आणि मुक्ताईनगर परिसरातील वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला. महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन दुरुस्तीची कामे सुरू केली आहेत. मात्र अनेक भागांमध्ये वीजपुरवठा सुरळीत होण्यासाठी काही कालावधी लागण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांचे मोठे नुकसान झाले असून तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. प्रशासनानेही नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून बाधित कुटुंबांना मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे.

---

## आंबेगाव पूर्वेत केबल चोऱ्यांचे सत्र सुरूच

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात भुरट्या चोरांचा धुमाकूळ सुरूच असून शेतकऱ्यांच्या वीजपंपांच्या केबल चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. मागील आठवड्यात रांजणी-खडकवाडी परिसरातील नरसिंह बंधाऱ्यावर ५५ शेतकऱ्यांच्या वीजपंपांच्या केबल चोरीला गेल्याची घटना ताजी असतानाच आता वळती गावातील वाळुंजमळा बंधाऱ्यावर तीन शेतकऱ्यांच्या पंपांच्या केबल अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना समोर आली आहे. मंगळवारी (दि. २ जून) ही बाब उघडकीस आल्यानंतर परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मीना नदीकाठच्या शेतांमध्ये सिंचनासाठी मोठ्या प्रमाणावर वीजपंपांचा वापर केला जातो. मात्र, सध्या नदीचे पात्र कोरडे पडल्याने अनेक पंप उघड्यावर आहेत. याच परिस्थितीचा फायदा घेत चोरट्यांनी सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास वाळुंजमळा बंधाऱ्यावरील पंपांच्या केबल कापून नेल्या. चोरी केलेल्या केबलमधील तांब्याच्या तारा काढण्यासाठी त्या जवळील मक्याच्या शेतात नेऊन सोलल्याचेही आढळून आले. वाळुंजमळा बंधाऱ्यावर रांजणी आणि वळती परिसरातील सुमारे १५ ते १६ शेतकऱ्यांचे वीजपंप आहेत. त्यापैकी अक्षय बबन भोर, बबन नारायण भोर आणि विकास मावकर यांच्या पंपांच्या केबल चोरीला गेल्या आहेत. या घटनेमुळे संबंधित शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असून सिंचन व्यवस्थेवरही परिणाम होणार आहे. शेतीमालाला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. खत, बियाणे, औषधे आणि मजुरीच्या वाढत्या खर्चामुळे शेती करणे अवघड झाले असताना अशा चोरीच्या घटनांमुळे त्यांची चिंता अधिक वाढली आहे. वारंवार घडणाऱ्या केबल चोरीमुळे पोलिस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. नरसिंह बंधाऱ्यावर एकाच वेळी ५५ शेतकऱ्यांच्या केबल चोरीला गेल्या होत्या. त्यानंतरही बंदोबस्त करण्यात अपयश आल्याने नाराजीचा सूर उमटत आहे. या चोरींचा सखोल तपास करून आरोपींना तातडीने अटक करावी तसेच नदीकाठच्या शेत परिसरात गस्त वाढवावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी पोलिसांकडे केली आहे.

---

## रानमळ्यात पुन्हा बिबट्याचे दर्शन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्यातील रानमळा परिसरात पुन्हा एकदा बिबट्याचे दर्शन झाल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मंगळवारी (दि. २ जून) सायंकाळी सात ते आठ वाजण्याच्या सुमारास चिमटा-रानमळा मार्गावर बिबट्या ऐटीत रस्ता ओलांडताना दिसल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.

मारुती सिनलकर यांनी रस्त्यावरून जात असताना बिबट्याला प्रत्यक्ष पाहिल्याचे सांगितले. बिबट्याचे दर्शन होताच त्यांनी तत्काळ वनविभागाला माहिती दिली. माहिती मिळताच वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिसरात पाहणी करत सायरन वाजवून नागरिकांना सतर्क केले. तसेच बिबट्याचा वावर आढळल्यास त्वरित वनविभागाशी संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले. वनविभागाने तत्काळ प्रतिसाद दिल्याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत कर्मचाऱ्यांचे आभार मानले. मात्र, परिसरात वारंवार बिबट्याचे दर्शन होत असल्याने नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे.

भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊसतोड पूर्ण झाल्यानंतर बिबट्यांना लपण्यासाठी जागा उरलेली नाही. त्यामुळे अन्न आणि पाण्याच्या शोधात ते मानवी वस्तीकडे वळत आहेत. यापूर्वीही ग्रामस्थांना बिबट्याचे दर्शन झाले असून मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात एका दुचाकीस्वार तरुणावर बिबट्याने हल्ला करून त्याला जखमी केल्याची घटना घडली होती. या परिसरात एक नव्हे तर तीन ते चार बिबटे वावरत असल्याचा अंदाज ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. वाढता वावर लक्षात घेता वनविभागाने तातडीने पिंजरा लावून बिबट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी सरपंच राजू सिनलकर यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे.

---

## १५ लाखांचे दागिने ग्राहकाला परत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**रांजणगाव गणपती** : प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठेचे उत्कृष्ट उदाहरण घालून देत जीएस महानगर बँकेच्या शिरूर शाखेतील कर्मचारी राजेश वराळ यांनी ग्राहकाचे सुमारे नऊ तोळे वजनाचे, अंदाजे १५ लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने परत करून सर्वांचे कौतुक मिळवले आहे. त्यांच्या या प्रामाणिकपणाबद्दल बँकेच्या अध्यक्षा गीतांजली शेळके यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, छाया बाळासाहेब शेळके या नेहमीप्रमाणे जीएस महानगर बँकेच्या शिरूर शाखेत लॉकरची पाहणी करण्यासाठी आल्या होत्या. लॉकरमधील व्यवहार पूर्ण करून त्या निघून गेल्या. मात्र, त्यावेळी त्यांचे नऊ तोळे सोन्याचे दागिने नकळत लॉकर रूममध्ये खाली पडले. काही वेळाने बँकेचे कर्मचारी राजेश वराळ हे कामानिमित्त लॉकर रूममध्ये गेले असता त्यांना हे दागिने आढळून आले. त्यांनी दागिने सुरक्षित ताब्यात घेतले आणि शाखाधिकारी बाबाजी लामखडे यांना याबाबत माहिती दिली. नुकत्याच छाया शेळके लॉकर रूममध्ये गेल्याची बाब लक्षात आल्याने लामखडे यांनी त्यांच्याशी संपर्क साधून तातडीने बँकेत बोलावून घेतले.

बँकेत आल्यानंतर लॉकरची तपासणी करताना दागिने नसल्याचे छाया शेळके यांच्या लक्षात आले. त्यानंतर शाखाधिकाऱ्यांनी सुरक्षित ठेवलेले दागिने त्यांना दाखवून परत केले. बँकेच्या अध्यक्षा गीतांजली शेळके शाखेला भेट देण्यासाठी आल्या होत्या. त्यांच्या हस्ते दागिने छाया शेळके यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. या प्रसंगी बोलताना गीतांजली शेळके यांनी राजेश वराळ यांच्या प्रामाणिकपणाचे विशेष कौतुक केले. ग्राहकांचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी अशा कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

जीएस महानगर बँकेत गेल्या २५ ते ३० वर्षांपासून सेवा बजावत असलेले राजेश वराळ यांनी आपल्या प्रामाणिक आणि निष्ठावान कार्यपद्धतीमुळे बँकेचा नावलौकिक वाढवला आहे. त्यांचे विविध स्तरांतून कौतुक होत असून अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

---

ग्रामपंचायत सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

# आंबेगावातील २८ ग्रा.पं.साठी १२ जूनला सोडत

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मंचर** : आंबेगाव तालुक्यातील मुदत संपलेल्या तसेच २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या २८ ग्रामपंचायतींच्या निवडणूक प्रक्रियेला वेग आला असून ग्रामपंचायत सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. या ग्रामपंचायतींसाठी प्रभागनिहाय आरक्षण सोडत १२ जून रोजी काढण्यात येणार असल्याची माहिती प्रभारी तहसीलदार डॉ. सचिन वाघ यांनी दिली.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांनंतर आता ग्रामपंचायत निवडणुकांकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. जिल्हा प्रशासनाने ग्रामपंचायतींची प्रभागरचना अंतिम केली असून पुढील टप्प्यात आरक्षण प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. प्रभाग आरक्षणाची अंतिम यादी १० जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर मतदारांची अहर्ता तारीख जाहीर करून प्रभागनिहाय मतदारयाद्यांचे विभाजन करण्यात येईल.

आंबेगाव तालुक्यातील कोलदरा-गोनवडी, धोंडमाळ-शिंदेवाडी, रानमळा, काळेवाडी-दरेकरवाडी, थुगाव, गिरवली, शिंगवे, काठापूर बुद्रुक, जवळे, शिरदाळे, लौकी, वळती, भराडी, पिंपळगाव तर्फे म्हाळुंगे, म्हाळुंगे पडवळ, पेठ, कारेगाव, कोळवाडी-कोटमदरा, पिंगळवाडी-लांडेवाडी, खडकी, चिंचोली, एकलहरे, भागडी, साकोरे, गावडेवाडी, खडकवाडी, शेवाळवाडी आणि अवसरी खुर्द या २८ ग्रामपंचायतींच्या निवडणुका होणार आहेत.

आरक्षण सोडतीसाठी ८ जून रोजी ग्रामसभेची अधिसूचना प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर १२ जून रोजी ग्रामसभांमध्ये सदस्यांच्या आरक्षणाची सोडत काढण्यात येईल. १९ जून रोजी प्रभागनिहाय प्रारूप आरक्षण प्रसिद्ध होणार असून १९ ते २५ जून या कालावधीत हरकती आणि सूचना स्वीकारल्या जातील. प्राप्त हरकतींवर प्रांताधिकाऱ्यांचा अभिप्राय ३ जुलैपर्यंत घेतला जाणार असून १० जुलै रोजी अंतिम आरक्षण यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

आरक्षण सोडतीनंतर अनेक ग्रामपंचायतींमधील राजकीय समीकरणे स्पष्ट होणार असल्याने इच्छुक उमेदवार, स्थानिक गट-तट आणि नागरिकांचे लक्ष या प्रक्रियेकडे लागले आहे. आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील राजकीय हालचालींनाही वेग येण्याची शक्यता आहे.

---

## रांजणगाव उपसरपंचपदी मनीषा पाचुंदकर बिनविरोध

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**रांजणगाव गणपती** : येथील महत्त्वाच्या ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी मनीषा गणेश पाचुंदकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या सभेत त्यांच्या निवडीची घोषणा करण्यात आली.

माजी उपसरपंच शोभा रमेश शेळके यांनी इतर सदस्यांना संधी मिळावी या उद्देशाने आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने उपसरपद रिक्त झाले होते. या रिक्त पदासाठी अर्ज मागविण्यात आले असता मनीषा पाचुंदकर यांचा एकमेव उमेदवारी अर्ज प्राप्त झाला. त्यामुळे त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे लोकनियुक्त सरपंच सुवर्णा वायदंडे यांनी जाहीर केले. या निवड प्रक्रियेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ग्रामपंचायत अधिकारी राजाराम रासकर यांनी कामकाज पाहिले. यावेळी आंबेगाव-शिरूर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर पाटील, माजी उपसरपंच श्रीकांत पाचुंदकर, उद्योजक प्रा. माणिक खेडकर, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सारांश वृत्त

### पंजाब आणि हरियाणा तापले

**चंदिगड :** हरियाणा आणि पंजाबच्या अनेक भागात बुधवारी उष्ण हवामान कायम असून रोहतकमध्ये कमाल तापमान ४२.१ अंश सेल्सिअस नोंदले गेले आहे, ज्यामुळे ते राज्यातील सर्वात उष्ण ठिकाण ठरले आहे, असे हवामान अधिकाऱ्यांनी सांगितले. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, सिरसामध्येही ४२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. गुरुग्राममध्ये ३८.२ अंश सेल्सिअस, अंबाला येथे ३९.४ अंश, हिसार येथे ४०.५ अंश आणि भिवानी येथे ४० अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

### अण्णाद्रमुक सोडणार नाही

**पुडुकोट्टाई (तामिळनाडू) :** अण्णाद्रमुकचे माजी मंत्री डॉ. सी. विजयभास्कर यांनी पक्ष बदलण्याच्या अफवांना उत्तर देण्यास नकार दिला आणि आपण अण्णाद्रमुकमध्येच राहतील असे संकेत दिले. सत्ताधारी टीव्हीकेमध्ये सामील होण्याची अफवा पसरली असताना, माजी आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की त्यांनी गेल्या चार दिवसांत आपल्या विरालीमलाई विधानसभा मतदारसंघाचा दौरा केला, मतदार आणि समर्थकांना भेटून त्यांना आमदार म्हणून निवडून दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. ही बैठक नियमित होती आणि त्यांच्या नियमित राजकीय संबंधांचा एक भाग होती, असे विजयभास्कर यांनी येथे पत्रकारांना सांगितले.

### मुसळधार पावसामुळे दरड कोसळली

**इटानगर :** अरुणाचल प्रदेशातील लोअर सियांग, लेपराडा, पश्चिम सियांग आणि अप्पर सुबनसिरी जिल्ह्यांना जोडणाऱ्या अकाजन-लिकाबाली-बामे रोडवरील वाहनांची वाहतूक बुधवारी मुसळधार पावसामुळे दरडी कोसळल्याने विस्कळीत झाली आणि अनेक ठिकाणी मोडतोड साचल्याने वाहतूक विस्कटली. लोअर सियांग जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी (डीडीएमओ) तारिक नितान यांनी सांगितले की, सिजी, हाथी नाला आणि ब्रह्मपुत्रा व्ह्यू पॉईंट येथे रस्ते खचले आहेत, ज्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली आहे.

## भव्य सोहळ्यात घेतली पदाची शपथ

# डी. के. शिवकुमार कर्नाटकचे मुख्यमंत्री

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**बंगळूर :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डोड्डालाहल्ली केम्पेगौडा (डी. के.) शिवकुमार यांनी बुधवारी कर्नाटकच्या १८ व्या मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. बंगळूर येथील लोकभवनमधील ग्लास हाऊसमध्ये झालेल्या भव्य सोहळ्यात राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी हजारो नागरिक, राजकीय नेते आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

६४ वर्षीय डी. के. शिवकुमार हे आठ वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. शपथविधीपूर्वी त्यांनी वीर गंगाधर अज्जय्या यांना अभिवादन करून पुष्पांजली अर्पण केली. भारतीय राज्यघटनेची प्रत हातात घेऊन त्यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. या सोहळ्यात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जी. परमेश्वर यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. तसेच के. एच. मुनियप्पा, के. जे. जॉर्ज, एम. बी. पाटील, रामलिंगा रेड्डी, सतीश जारकीहोळी, कृष्णा बायरेगौडा, प्रियांक खर्गे, यू. टी. खादर, ईश्वर खांद्रे, डॉ. यतींद्र सिद्धरामय्या, बायरथी सुरेश आणि शरण प्रकाश पाटील यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली.

नव्या मंत्रिमंडळात यू. टी. खादर आणि डॉ. यतींद्र सिद्धरामय्या यांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे, तर इतर अनेक मंत्री माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या मंत्रिमंडळात कार्यरत होते. मंत्रिमंडळातील चार सदस्य बंगळूर शहराचे प्रतिनिधित्व करतात. शपथविधी सोहळ्यासाठी ग्लास हाऊसची सजावट कर्नाटकच्या ध्वजातील लाल आणि पिवळ्या रंगांनी करण्यात आली होती. ज्योतिष सल्ल्यानुसार व्यासपीठ पूर्वाभिमुख ठेवण्यात आले होते. व्यासपीठाच्या पार्श्वभूमीवर विधानसौधाची प्रतिकृती उभारण्यात आली होती.

या सोहळ्यास काँग्रेस नेते राहुल गांधी, अखिल भारतीय काँग्रेस समितीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या, माजी मुख्यमंत्री वीरप्पा मोईली, रणदीपसिंग सुरजेवाला, के. सी. वेणुगोपाल, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदरसिंग सुक्खू यांच्यासह अनेक वरिष्ठ नेते उपस्थित होते. तसेच कर्नाटक उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश विभू बाखरू, इन्फोसिसचे सहसंस्थापक नारायण मूर्ती व सुधा मूर्ती, माजी क्रिकेटपटू व्यंकटेश प्रसाद, मोहम्मद अझरुद्दीन, अनिल कुंबळे, अभिनेते धनंजय आणि अभिनेत्री राम्या यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनीही या ऐतिहासिक सोहळ्याला हजेरी लावली.

कर्नाटकच्या राजकारणात महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या या सत्तांतरानंतर डी. के. शिवकुमार यांच्या नेतृत्वाखालील सरकारकडे राज्याच्या विकासाबाबत मोठ्या अपेक्षेने पाहिले जात आहे.

## निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास वाढला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशातील नुकत्याच पार पडलेल्या पाच विधानसभा निवडणुकांमध्ये झालेल्या विक्रमी मतदानातून मतदारांचा लोकशाही प्रक्रियेवरील आणि निवडणूक व्यवस्थेवरील दृढ विश्वास अधोरेखित होत असल्याचे प्रतिपादन मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी केले.

'निवडणूक प्रचारातील माध्यमांसाठी जागतिक सर्वोत्तम पद्धती' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेत बोलताना त्यांनी निवडणूक आयोगाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. भारतासारख्या विशाल लोकशाही व्यवस्थेत १०० कोटींहून अधिक मतदारांपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यासाठी निवडणूक आयोग तळागाळातील यंत्रणा अधिक सक्षम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

ज्ञानेश कुमार म्हणाले की, मतदान प्रक्रिया अधिक पारदर्शक, विश्वासार्ह आणि सर्वसमावेशक करण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) तसेच मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) यांना नियमित प्रशिक्षण दिले जाते. यामुळे मतदार नोंदणी, जागरूकता आणि मतदान प्रक्रियेत सुसूत्रता निर्माण होत आहे.

ही दोन दिवसीय परिषद २३ जानेवारी रोजी आयोजित 'इंडिया इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन डेमॉक्रसी अँड इलेक्शन मॅनेजमेंट'मध्ये स्वीकारण्यात आलेल्या 'दिल्ली जाहीरनाम्या'च्या अंतिम अहवालासाठी योगदान देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आली होती.

मुख्य निवडणूक आयुक्तांनी सांगितले की, नुकत्याच झालेल्या पाच राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील विधानसभा निवडणुकांमध्ये मतदारांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढला आहे. विशेषतः पश्चिम बंगाल, आसाम, तामिळनाडू आणि पुदुच्चेरी येथे सर्वाधिक ऐतिहासिक विक्रमी मतदान नोंदविण्यात आले. ही बाब लोकशाहीच्या बळकटीकरणाचे प्रतीक असल्याचे निवडणूक आयुक्तांनी नमूद केले.

## अमरनाथ यात्रेसाठी हेलिकॉप्टर सेवा बंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर :** यंदाच्या अमरनाथ यात्रेदरम्यान यात्रेकरूंना हेलिकॉप्टर सेवेचा लाभ घेता येणार नाही. दक्षिण काश्मीरमधील अमरनाथ गुहेकडे जाणारे सर्व मार्ग केंद्रशासित प्रदेश प्रशासनाने 'नो फ्लाय झोन' म्हणून घोषित केले असून सुरक्षेच्या कारणास्तव ही सेवा स्थगित करण्यात आली आहे.

१ जून २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, ३ जुलैपासून सुरू होणाऱ्या आणि २८ ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या ५७ दिवसांच्या अमरनाथ यात्रेदरम्यान पारंपरिक पहलगाम मार्ग तसेच बालटाल मार्गासह संपूर्ण यात्रा क्षेत्र उड्डाणबंदी क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यामुळे यात्रेकरूंना हेलिकॉप्टर सेवा उपलब्ध राहणार नाही. श्री अमरनाथ श्राइन बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, यात्रेकरू अमरनाथ गुहेपर्यंत पायी जाऊ शकतात किंवा पोनी व पालखी सेवांचा वापर करू शकतात. हेलिकॉप्टर सेवा बंद असल्याची नोंद यात्रेचे नियोजन करताना भाविकांनी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

सुरक्षा यंत्रणांच्या माहितीनुसार, संपूर्ण यात्रा मार्ग 'नो फ्लाय झोन' घोषित करण्यामागील प्रमुख उद्देश ड्रोनसह कोणत्याही अनधिकृत हवाई हालचालींवर नियंत्रण ठेवणे हा आहे. यात्रेच्या काळात दोन्ही मार्गांवर अत्याधुनिक साधनांच्या मदतीने चोवीस तास हवाई आणि भौतिक देखरेख ठेवण्यात येणार आहे. सलग दुसऱ्या वर्षी यात्रेदरम्यान हेलिकॉप्टर सेवा बंद ठेवण्यात आली आहे.

२२ एप्रिल २०२५ रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २५ पर्यटक आणि एका स्थानिक पोनीवाल्याचा मृत्यू झाला होता. त्यानंतर सुरक्षा यंत्रणांनी यात्रा मार्गांवरील सुरक्षा अधिक कडक केली असून गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही ही सेवा स्थगित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांना मोठा धक्का

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या राजकारणात बुधवारी मोठी घडामोड घडली. तृणमूल काँग्रेसमधील बंडखोर गटाने पक्षातून हकालपट्टी करण्यात आलेले नेते ऋतब्रत बॅनर्जी यांची विरोधी पक्षनेतेपदी केलेली निवड विधानसभा अध्यक्षांनी मान्य केली. त्यामुळे पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना मोठा राजकीय धक्का बसल्याचे मानले जात आहे.

विधानसभा अध्यक्षांची भेट घेतल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना ऋतब्रत बॅनर्जी यांनी सांगितले की, सध्या त्यांच्या गटाला ५८ आमदारांचा पाठिंबा असून आणखी दोन आमदार लवकरच गटात सहभागी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांच्या गटाची संख्या ६० वर पोहोचेल, असा दावा त्यांनी केला. "तृणमूल काँग्रेसच्या चिन्हावर निवडून आलेल्या ५८ आमदारांचा आमच्या गटाला पाठिंबा आहे. आणखी दोन आमदारांनी पाठिंबा दर्शविल्यास आमची ताकद आणखी वाढेल," असे ऋतब्रत बॅनर्जी यांनी सांगितले.

विधानसभा अध्यक्षांनी विधिमंडळ पक्षाची नव्याने झालेली रचना मान्य केली असून विरोधी पक्षनेत्यांसाठी राखीव कार्यालयही त्यांच्यासाठी खुले करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी ऋतब्रत बॅनर्जी यांनी ममता बॅनर्जी यांना विधिमंडळ पक्षाच्या प्रमुख सल्लागाराची भूमिका स्वीकारण्याचे आवाहन केले. तसेच बंडखोर गटाचा तृणमूल काँग्रेसचे नेते अभिषेक बॅनर्जी यांच्याशी फारसा राजकीय संबंध नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, बंडखोर गटाने विधिमंडळ पक्षाची नवी नेतृत्व संरचना जाहीर केली आहे. अखरुज्झमान यांची मुख्य प्रतोदपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्त्यांची माहिती विधानसभा अध्यक्षांना लेखी स्वरूपात देण्यात आल्याचेही ऋतब्रत बॅनर्जी यांनी सांगितले. यापूर्वी ५८ आमदारांनी विधानसभा अध्यक्ष रथीनद्रनाथ बोस यांना पत्र देऊन ऋतब्रत बॅनर्जी यांना विरोधी पक्षनेते म्हणून मान्यता देण्याची मागणी केली होती. त्यामुळे बंडखोर गटाने स्वतःलाच पक्षाचा खरा विधिमंडळ गट असल्याचा दावा अधिक बळकट केला आहे. अभिषेक बॅनर्जी यांनी कोलकात्यातील बालीगंज मतदारसंघाचे आमदार शोभनदेव चट्टोपाध्याय यांचे नाव विरोधी पक्षनेतेपदासाठी सुचविले होते. मात्र काही आमदारांच्या बनावट स्वाक्षऱ्यांचा आरोप झाल्यानंतर हा प्रस्ताव अध्यक्षांनी स्वीकारला नाही. या घडामोडींनंतर ममता बॅनर्जी यांच्या अडचणी वाढण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

## बँक खात्याबाबत सीबीएसईचे स्पष्टीकरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** उत्तरपत्रिकांच्या पडताळणी आणि पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना स्टेट बँक ऑफ इंडिया, कॅनरा बँक, बँक ऑफ बडोदा किंवा इंडियन बँकेत खाते असणे आवश्यक नाही, असे केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) स्पष्ट केले आहे. विद्यार्थी आणि पालकांमध्ये निर्माण झालेल्या संभ्रमानंतर सीबीएसईने हे स्पष्टीकरण जारी केले.

सीबीएसईच्या पडताळणी आणि पुनर्मूल्यांकन पोर्टलवर केवळ चार बँकांच्या पेमेंट गेटवेची सुविधा उपलब्ध असल्याने अनेक विद्यार्थ्यांनी चिंता व्यक्त केली होती. त्यावर स्पष्टीकरण देताना मंडळाने सांगितले की, संबंधित बँका फक्त पेमेंट गेटवे उपलब्ध करून देतात. मात्र विद्यार्थ्यांना त्या बँकांमध्ये खाते असणे बंधनकारक नाही. सीबीएसईने 'एक्स'वरील निवेदनात म्हटले आहे की, उमेदवार यूपीआय, नेट बँकिंग, क्रेडिट कार्ड आणि डेबिट कार्डद्वारे शुल्क भरू शकतात. त्यामुळे कोणत्याही बँकेचे खाते असले तरी अर्ज प्रक्रिया पूर्ण करता येते.

मंडळाच्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी ९.३० वाजेपर्यंत सुमारे ४० हजार विद्यार्थ्यांनी कोणतीही अडचण न येता अर्ज प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केली होती. तसेच दुपारी १२ वाजेपर्यंत उत्तरपत्रिकांच्या पडताळणीसाठी ४,९२४ आणि पुनर्मूल्यांकनासाठी ३९,०५६ असे एकूण ४३,९८० अर्ज प्राप्त झाले होते. सीबीएसईने विद्यार्थ्यांना आणि पालकांना सोशल मीडियावरील अफवांवर विश्वास न ठेवता मंडळाच्या अधिकृत माहितीवर अवलंबून राहण्याचे आवाहन केले आहे. दिल्ली विधानसभा विरोधी पक्षनेत्या आतिशी यांनी पुनर्मूल्यांकन शुल्क केवळ चार सरकारी बँकांमार्फतच भरता येत असल्याचा आरोप केला होता.

## खंडणी प्रकरणातील पोलिसांचा अटकपूर्व जामीन रद्द

# सर्वोच्च न्यायालयाने ओढले ताशेरे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** खंडणी प्रकरणात आरोपी असलेल्या तीन पोलिस अधिकाऱ्यांना मुंबई उच्च न्यायालयाने दिलेला अटकपूर्व जामीन सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला आहे. तसेच उच्च न्यायालयाचा आदेश 'गुप्त' स्वरूपाचा असल्याचे नमूद करत त्यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. कायद्याची अंमलबजावणी करणारेच जर खंडणीखोर बनले, तर नागरिकांचा व्यवस्थेवरील विश्वास उडतो आणि संपूर्ण यंत्रणेबाबत संशय निर्माण होतो, असे स्पष्ट निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले.

न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. खंडपीठाने म्हटले की, गणवेशातील अधिकाऱ्यांकडून अधिकारांचा गैरवापर झाल्यास सामान्य नागरिकांसमोर नमते घेण्याशिवाय पर्याय उरत नाही.

प्रकरणानुसार, तक्रारदार आपल्या मुलीसह मुंबईहून हापा दुरांतो एक्स्प्रेसने प्रवास करत होता. त्यांना निरोप देण्यासाठी आलेल्या त्यांच्या मेव्हण्यालाही रेल्वे स्थानकावरील घातपात-शोध पथकातील कर्मचाऱ्यांनी ताब्यात घेतल्याचा आरोप आहे. तपासादरम्यान तक्रारदाराकडे १४ ग्रॅम वजनाची सोन्याची पट्टी आणि ३१ हजार ९०० रुपये रोख रक्कम आढळली होती.

समाधानकारक स्पष्टीकरण दिले असतानाही गणवेशधारी कर्मचाऱ्यांनी त्यांना एका बंद खोलीत नेऊन धमकावले, शिवीगाळ केली आणि सोन्याची पट्टी परत मिळवण्यासाठी रोख रक्कम देण्यास भाग पाडल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर तक्रारदाराने एफआयआर दाखल केला होता. सत्र न्यायालयाने आरोपी पोलिस अधिकाऱ्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला होता. मात्र, नंतर मुंबई उच्च न्यायालयाने सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपी अधिकाऱ्यांनी ओळखपत्र परिधान केले होते तसेच तक्रारदार आणि त्यांच्या मुलीने एफआयआर दाखल करण्यास उशीर केल्याचे नमूद करत त्यांना अटकपूर्व जामीन मंजूर केला होता.

या आदेशावर सर्वोच्च न्यायालयाने कठोर शब्दांत टीका केली. सीसीटीव्ही फुटेजमध्ये व्यक्तींचे हावभाव स्पष्ट दिसत नसले तरी त्रासाची स्पष्ट चिन्हे दिसत होती. तरीही उच्च न्यायालयाने त्याची दखल घेतली नसल्याचे खंडपीठाने नमूद केले. "फुटेजमध्ये दोन प्रौढ व्यक्ती पुढे जात असताना एक मुलगा मागे राहून हातवारे करताना दिसत होता. हे संकटाचे स्पष्ट संकेत होते. अशा परिस्थितीत त्रासाचे कोणतेही चिन्ह दिसत नाही, असे उच्च न्यायालयाने कसे म्हटले, याचे आम्हाला आश्चर्य वाटते," असे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले. तसेच बंद खोलीत संबंधितांना ठेवण्यात आले होते. त्या काळात त्यांच्यावर दबाव टाकण्यात आला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्व बाबींची फौजदारी खटल्यादरम्यान सखोल पडताळणी होणे आवश्यक असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. या निरीक्षणांसह अटकपूर्व जामीन रद्द केला.

## नेतान्याहूंवर अमेरिकी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांची नाराजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बेरूत :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्याशी झालेल्या दूरध्वनी संभाषणात त्यांच्यावरील नाराजी व्यक्त केल्याची कबुली दिली आहे. लेबनॉनमध्ये हिजबुल्लाविरोधात सुरू असलेल्या इस्रायली कारवायांमुळे इराणसोबतच्या शांतता चर्चेला अडथळा निर्माण होत असल्याने आपण नाराज झालो होतो, असे ट्रम्प यांनी एका मुलाखतीत सांगितले.

नेतान्याहू यांच्याशी आपले संबंध चांगले असल्याचे स्पष्ट करताना ट्रम्प म्हणाले, "मला बिबी खूप आवडतात. आम्ही नेहमीच चांगले काम केले आहे." तरीही इराण-इस्रायल संघर्ष लवकर संपविण्यासाठी त्यांच्यावर वाढता दबाव असल्याचे त्यांच्या वक्तव्यातून दिसून आले. इराणबाबत बोलताना ट्रम्प यांनी होर्मुझ सामुद्रधुनी काही काळ बंद राहू शकते, असे म्हटले. मात्र परिस्थिती लवकरच सुधारेल आणि तेल-गॅस वाहतूक पूर्ववत सुरू होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. इराणने अण्वस्त्रनिर्मितीशी संबंधित सर्व प्रयत्न थांबवावेत, अशी भूमिकाही त्यांनी पुन्हा मांडली. ट्रम्प यांनी इराणचे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनेई हे युद्धबंदी आणि शांतता चर्चेच्या प्रक्रियेत सहभागी असल्याचा दावा केला. हवाई हल्ल्यात जखमी झाल्यानंतरही ते चर्चेला मान्यता देत असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, लेबनॉनमध्ये संघर्ष कायम असून बेरूतच्या दक्षिणेकडील खालदेह परिसरात इस्रायलने बुधवारी वाहनावर हल्ला केला. या हल्ल्यातील लक्ष्य ठार झाले की नाही, याबाबत तात्काळ माहिती मिळू शकली नाही. इस्रायलने यापूर्वी अशा कारवायांमध्ये हिजबुल्लाच्या सदस्यांना लक्ष्य केल्याचा दावा केला आहे. अमेरिकेच्या मध्यस्थीने इस्रायल आणि लेबनॉन यांच्यात नुकताच एक करार झाला आहे. त्यानुसार इस्रायल बेरूतच्या दक्षिण उपनगरांवर हल्ले करणार नाही, तर हिजबुल्ला उत्तर इस्रायलवरील हल्ले थांबवेल. मात्र करारानंतरही दक्षिण लेबनॉनमध्ये हवाई हल्ले सुरूच असून संघर्ष पूर्णपणे थांबलेला नाही.

या संघर्षात आतापर्यंत लेबनॉनमध्ये ३,४६८ जणांचा मृत्यू झाला असून सुमारे १२ लाख लोक विस्थापित झाले आहेत.

## मानवी तस्करी प्रकरणी छापेमारी

**नवी दिल्ली :** भारत आणि कंबोडियात कार्यरत असलेल्या मानवी तस्करीच्या सिंडिकेटच्या मनी लॉन्ड्रिंगच्या चौकशीचा एक भाग म्हणून सक्तवसुली संचालनालयाने बुधवारी पंजाब आणि उत्तर प्रदेशातील ठिकाणांवर छापे टाकले. ते म्हणाले की, या सिंडिकेटचा संघटित मानवी तस्करी, सायबर फसवणूक आणि या बेकायदेशीर कामांमधून मिळणाऱ्या गुन्हेगारीच्या कमाईच्या लॉन्ड्रिंगमध्ये सामील असल्याचा संशय आहे. निवासी जागेची झडती घेण्यात आली.

## राहुल यांच्या दौऱ्याने वातावरण तापले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**डेहराडून :** उत्तराखंडातील २०२७ विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय हालचालींना वेग आला असून काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या दोन दिवसीय दौऱ्यामुळे राजकीय वातावरण तापले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस नितीन नवीन यांच्या अलीकडील दौऱ्यांनंतर आता राहुल गांधींचा दौरा राज्यातील राजकीय समीकरणांसाठी महत्त्वाचा मानला जात आहे.


सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळविण्याच्या उद्देशाने भाजपने डेहराडून आणि हरिद्वारसारख्या मैदानी भागांवर लक्ष केंद्रित केले आहे. तर काँग्रेसने डोंगराळ जिल्ह्यांमध्ये संघटन मजबूत करून भाजपच्या वर्चस्वाला आव्हान देण्याची रणनीती आखली आहे.

गेल्या नऊ वर्षांपासून उत्तराखंडमध्ये सत्तेबाहेर असलेल्या काँग्रेससाठी २०२७ ची निवडणूक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. २०१७ आणि २०२२ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये पराभव स्वीकारावा लागल्यानंतर आता पक्षासमोर अस्तित्व टिकविण्याचे आव्हान उभे राहिले आहे. सलग तिसरा पराभव काँग्रेसला राज्याच्या राजकारणाच्या कडेला नेऊ शकतो, अशी भीती पक्षात व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेतृत्वाने नोव्हेंबर २०२५ मध्ये संघटनात्मक फेरबदल केले. राहुल गांधी यांच्या दौऱ्यामुळे या मोहिमेला अधिक बळ मिळण्याची अपेक्षा आहे.

## रशियातील महत्त्वाच्या तेल टर्मिनलला आग

# युक्रेनचा रशियाच्या सेंट पीटर्सबर्गवर ड्रोन हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कीव्ह/मॉस्को :** युक्रेनने रशियावरील लांब पल्ल्याच्या ड्रोन हल्ल्यांची तीव्रता वाढवत सेंट पीटर्सबर्गमधील एका महत्त्वाच्या तेल टर्मिनलवर हल्ला केला. या हल्ल्यात टर्मिनलला आग लागली असून बंदर परिसरात काळ्या धुराचे लोट पसरल्याचे वृत्त आहे. युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी या कारवाईची पुष्टी केली आहे.

झेलेन्स्की यांनी सांगितले की, युक्रेनच्या ड्रोनने एक हजार किलोमीटरहून अधिक अंतर पार करून सेंट पीटर्सबर्गमधील लक्ष्यावर अचूक हल्ला केला. सेंट पीटर्सबर्ग हे रशियाचे दुसरे सर्वात मोठे शहर असून राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांचे जन्मस्थान आहे.

रशियन अधिकाऱ्यांनी शहरातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर ड्रोन हल्ला झाल्याचे मान्य केले. या हल्ल्यानंतर सेंट पीटर्सबर्ग विमानतळावरील उड्डाणे काही काळासाठी स्थगित करण्यात आली, तर मोबाइल इंटरनेट सेवाही तात्पुरत्या बंद करण्यात आल्या. रशिया-युक्रेन युद्ध पाचव्या वर्षात प्रवेश करत असताना दोन्ही देश लांब पल्ल्याच्या हल्ल्यांद्वारे रणनीतिक आघाडी मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. अलीकडेच युक्रेनच्या ड्रोन हल्ल्यांमुळे मॉस्कोतील विजय दिन परेडच्या कार्यक्रमात बदल करावे लागले होते. त्यामुळे सेंट पीटर्सबर्गवरील हल्ला पुतीन यांच्यासाठी आणखी एक धक्का मानला जात आहे. याच महिन्यात सेंट पीटर्सबर्ग येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय आर्थिक मंचाच्या पार्श्वभूमीवर हा हल्ला विशेष महत्त्वाचा मानला जात आहे. परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या या परिषदेला यंदा सौदी अरेबिया विशेष अतिथी देश म्हणून सहभागी होणार आहे.

दरम्यान, युक्रेनने रशियाच्या बाल्टिक फ्लीटच्या जुन्या नौदल तळावर तसेच तांबोव्ह प्रदेशातील शस्त्रनिर्मिती प्रकल्पावरही ड्रोन हल्ले केल्याचा दावा केला आहे. रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने मात्र हवाई संरक्षण दलाने रात्रीभरात ३५४ युक्रेनियन ड्रोन पाडल्याचा दावा केला आहे.

रशियाच्या नियंत्रणाखालील डोनेत्स्क प्रदेशात युक्रेनच्या हल्ल्यात मॉस्कोहून क्रिमियाकडे जाणाऱ्या बसला फटका बसून सात जणांचा मृत्यू झाला, तर ११ जण जखमी झाले. स्मोलेन्स्क प्रदेशातील ड्रोन हल्ल्यात दोन अग्निशामक जवानांचा मृत्यू झाला असल्याचेही रशियन अधिकाऱ्यांनी सांगितले.

युक्रेनने अमेरिकन बनावटीच्या पॅट्रियट हवाई संरक्षण क्षेपणास्त्रांच्या कमतरतेबाबत चिंता व्यक्त केली आहे. झेलेन्स्की यांनी संरक्षण यंत्रणांतील विलंबाबद्दल नाराजी व्यक्त करत हवाई संरक्षण क्षमता वाढविण्याची गरज अधोरेखित केली.

युक्रेनच्या हवाई दलाच्या माहितीनुसार, रशियाने मंगळवार रात्री १९८ ड्रोनद्वारे हल्ले केले, त्यापैकी १८९ ड्रोन निष्प्रभ करण्यात आले.